# कोवीड-१९ लसीकरण शिबीर










आज दिनांक २६/१०/२०२१ रोजी इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च, बडनेरा, अमरावती येथे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र यांचे संकल्पनेतून मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथक, स्थानिक आरोग्य विभाग, अमरावती व अमरावती महानगरपालिका यांचे मार्गदर्शनातून महाविद्यालयातर्फे विदयार्थी तसेच कर्मचाऱ्यांकरिता कोवीड-१९ लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ.सचिन दिघडे व प्रमुख अतिथी म्हणून प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र, मोदी हॉस्पिटल, बडनेरा येथील सौ.मोटघरे मॅडम व त्यांची चमू उपस्थित होती.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन दिघडे यांनी प्रथम पुष्पगुच्छ देऊन प्रमुख अतिथींचे स्वागत केले.अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्यांनी लसीकरणाचे महत्व पटवून दिले. तसेच सौ. मोटघरे यांनी कोरोना रोगाविषयी माहिती व लसीकरणाचे फायदे विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भाग्यश्री बोराडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. तुषार धोटे व प्रा. तेजश्री कडू यांनी केले. या शिबिराला विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने नोंदणी केली.